# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

महानगरपालिका मुख्यालय, काप-आळी, जुनी एस.टी.स्टँड, भिवंडी, जि. ठाणे, पिन कोड - ४२१३०२

## जाहीर सूचना

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या दिनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत खालील संवर्गात करारपध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात ठोक वेतनावर सहा महिने कालावधी करीता भरावयाची असून त्याकरीता पात्र उमेदवारांनी त्यांचे अर्ज, स्वपरिचय पत्र व शैक्षणिक अर्हते विषयक कागदपत्राच्या प्रतीसह फक्त नोंदणीकृत टपालानेच दि. १३/११/२०२० रोजी ठिक सायं ०६.१५ वाजेपर्यंत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय नवीन प्रशासकिय इमारत, काप-आळी, जुनी एस.टी.स्टँड, भिवंडी, जि. ठाणे. या पत्यावर पाठवावे. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच या कार्यालयात थेट अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी. मा. स्थायी समितीच्या मान्यतेने या ६ महिने कालावधीत वाढ/घट हाऊ शकेल मात्र हे पद तात्पुरत्या स्वरुपाचे राहतील व त्या पदावर सेवेत कायम केले जाणार नाही

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता व अनुभव | वयोमर्यादा | पद संख्या व आरक्षण (प्रवर्गानुसार) | मासिक एकत्रीय मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | समुदाय संघटक | १.उच्च माध्यमिक शालांत परिक्षा ३८ वर्षे एकुण पदे :- ०९ (इयत्ता बारावी) उत्तीर्ण २. एम.एस.सी.आय.टी उत्तीर्ण सामाजिक क्षेत्रातील कामाचा तीन वर्षाचा अनुभव | ३८ वर्षे (मागासवर्गीयां करीता ०५ वर्षे शिथीलक्षम) | एकूण पदे - ०९ अ.जा. ०१, अ.ज. ०१, वि. जा (अ) ०१, इ.मा.व. ०२, सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग ०२, आर्थिक दृष्या दुर्बल घटक ०१, सर्वसाधारण / खुला ०१ | १५,०००/- |

**अटी व शर्ती**

१. उमेदवाराने ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचा अर्जावर स्पष्ट उल्लेख करावा व कोणत्या प्रवर्गासाठी अर्ज केला आहे ते स्पष्ट उल्लेख करावा. अर्ज विहित नमुन्यातच करावा. विहित नमुन्या व्यातिरिक्त अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

२. अर्जासोबत प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती जोडण्यात याव्यात (जन्मतारीख, शिक्षण, जात, अनुभव तसेच अन्य शैक्षणिक प्रमाणपत्र इत्यादी)

३. अर्जामध्ये संपुर्ण नाव, पत्ता (पिन कोडसह), शैक्षणिक अर्हता, पुर्वानुभव नमुद करावा. तसेच पासपोर्ट आकाराचे छायाचित्र जोडावे. तसेच स्वःतचा ई-मेल आय डी व मोबाईल नं. सुध्दा नमुद करावा.

४. नेमणूकी संदर्भात निवड समितीने घेतलेले सर्व निर्णय अंतिम राहतील.

५. सदर नेमणुक संपुर्णपणे अस्थायी स्वरुपाची असुन कोणत्याही उमेदवारास सदर जाहिर सुचनेच्या अनुषंगाने सेवेत_कायम/नियमित केले जाणार नाही. निवड झालेल्या उमेदवारास विहीत नमुन्यात प्रतिज्ञापत्र करुन घ्यावे लागेल.

६. नियुक्ती देणे/नाकारणे तसेच नमुद कालावधीचे आत कोणत्याही क्षणी सेवेतुन कमी करण्याबाबतचे अधिकार मा.आयुक्त सो. यांचेकडे राखुन ठेवलेले आहेत.

७. उच्च शिक्षणास, महिलांना यांना प्राधान्य दिले जाईल. व अर्जाचा नमुना bncmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/-

उप-आयुक्त (मुख्यालय)

मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी